महाराष्ट्र पोलीस
सद्रक्षणाय खलनिग्रहणाय

# पोलीस उप आयुक्त वाहतुक विभाग, ठाणे शहर

तीन हात नाका, एल.बी.एस.मार्ग, नौपाडा, ठाणे (पश्चिम)
दुरध्वनी क्रमांक – ०२२–२५४०१०५६
Email ID – cp.thane.dcptraffic@mahapolice.gov.in

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

जा.क्र. पोउपआ/वावि/अधिसूचना/ ७४/२०२२ दि. २६/०८/२०२२

## "वाहतुक नियंत्रण अधिसुचना"

**ज्याअर्थी** ठाणे शहरातील वागळे इस्टेट परिसरातील गणेश मुर्ती विसर्जनाचे दिवशी म्हणजेच दि.०१/०९/२०२२, दि. ०४/०९/२०२२, दि. ०५/०९/२०२२ दि. ०६/०९/२०२२, दि. ०९/०९/२०२२ रोजी वागळे इस्टेट येथील रायलादेवी तलाव व वर्तकनगर येथील उपवन तलाव या ठिकाणी तसेच मुंबई उपनगर परिसरातील गणेश मुर्तीचे विसर्जन मोठया प्रमाणात केले जाते. विसर्जन मार्गावरील व परिसरातील वाहतूक सुनिश्चित रहावी याकरिता आम जनतेच्या सोईसाठी,

**त्याअर्थी,** मी, दत्तात्रय कांबळे, पोलीस उप आयुक्त, मुख्यालय ०१ अतिरिक्त कार्यभार पोलीस उप आयुक्त, वाहतूक विभाग, ठाणे शहर म्हणून, मला महाराष्ट्र शासन गृहविभाग क्र. एम.व्ही.ए.–११६/सीआर/३७/टीआर, दि. २७/०९/१९९६ चे अधिसूचनेनुसार मोटार वाहन कायदा कलम ११५, ११६ (१)(अ)(ब) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकाराचा वापर करून पुढील प्रमाणे अधिसूचना जारी करीत आहे :–

**प्रवेश बंद–** १) मॉडेला चेकनाका येथुन रोड नं. १६ व वागळे इस्टेट विभागाकडे जाणाऱ्या टी.एम.टी.बसेससह सर्व प्रकारच्या वाहनांना **सिंधुदुर्ग हॉटेल** येथून मुख्य रस्त्याने ( स.गो बर्वे मार्गाने ) जाण्यास **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे.

**पर्यायी मार्ग–** सदरची सर्व वाहने मॉडेला नाका येथुन रोड नं १६ व वागळे इस्टेट विभागाकडे जाणारी वाहने सिंधुदुर्ग हॉटेल येथे डावीकडे वळून जगदाळे ट्रान्सपोर्ट येथे उजवीकडे वळून शांताराम चव्हाण मार्गाने एम.आय.डी.सी ऑफिस येथे डावीकडे वळून मुख्य रस्त्याने ( स.गो बर्वे मार्गाने ) पुढे इच्छित स्थळी जातील.

**प्रवेश बंद–** २) वागळे इस्टेट, रोड नं. १६ कडून मॉडेला नाक्याकडे जाणाऱ्या टि.एम.टी बसेससह सर्व प्रकारच्या वाहनांना रोड नं. १६ पेट्रोल पंप येथे **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे.

**पर्यायी मार्ग–** सदरची वाहने वागळे इस्टेट व रोड नं. १६ कडुन मॉडेला नाका मुंबईकडे जाणारी वाहने रोड नं. १६ येथुन डावीकडे वळुन ॲग्रीकल्चर ऑफीस–ब्राडमा कंपनी–कामगार हॉस्पीटल समोरून–ई.एस.आय.एस. हॉस्पिटल रोडने नितीन जंक्शन मार्गे इच्छित स्थळी जातील.

**बस थांबा–** ३) किसननगर नं.३ येथील टी.एम.टी बस स्टॉप हा रोड नं. २२(गोल सर्कल) येथे तात्पुरता स्वरूपात देण्यात येत आहे.

**प्रवेश बंद–** ४) बेस्ट बसेस मॉडेला चेक नाका मार्गे तिनहात नाका येथे वळण घेवून जाणाऱ्या बसेसना मॉडेला चेक नाका येथे **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे.

**पर्यायी मार्ग–** सदरच्या बसेस मुलुंड चेक नाका येथेच प्रवासी उतरवतील व तेथूनच प्रवासी घेवून परत मुंबई कडे इच्छित स्थळी जातील.

**नो पार्कींग झोन–** ५) स.गो. बर्वे मार्ग, शांताराम चव्हाण मार्ग, रोड नं. २२ सर्कल–इंदिरानगर नाका व इंदिरानगर नाका–नितीन जंक्शन या रोडवर दोन्ही बाजुस सर्व प्रकारच्या वाहनांना पार्कीग करण्यास मनाई करण्यात येत आहे.

**प्रवेश बंद–** ६) देवदयानगर नाका/क्रॉस येथुन उपवन तलावाकडे जाणाऱ्या टि.एम.टी. बसेससह सर्व प्रकारच्या वाहनांना येऊर गेटपर्यंत प्रवेश बंद असुन त्यापुढे मुख्य दुतर्फा रस्त्याने उपवन तलावाकडे जाण्यास **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे.

**पर्यायी मार्ग–** देवदयानगर क्रॉस /नाका येथुन उपवन तलाव /गावंडबाग पोखरण नं. २ विभागाकडे जाणारी वाहने मत्रांजली बंगला – निळकंठ हाईट्स मार्गे मुख्य रस्त्याने पुढे इच्छित स्थळी जातील.

**प्रवेश बंद–** ७) कृत्रिम उपवन तलाव/पायलादेवी मंदिर प्रवेशद्वार/गावंडबाग कडुन येऊर गावाकडे उपवन मार्गे जाणाऱ्या दुतर्फा रस्त्याने टीएमटी बसेससह सर्व वाहनांना **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे.

**पर्यायी मार्ग–** कृत्रिम उपवन तलाव/पायलादेवी मंदिर प्रवेशद्वार/गावंडबाग कडुन येऊर गावाकडे जाणारी वाहने निळकंठ हाईट्स मार्गे देवदयानगर नाका/क्रॉस – शिवाईनगर सर्कल मार्गे इच्छित स्थळी जातील.

CamScanner

सदरची अधिसुचना ही गणपती विसर्जनाचे दिवशी म्हणजेच दि.०१/०९/२०२२, दि. ०४/०९/२०२२, दि. ०५/०९/२०२२ दि. ०६/०९/२०२२, दि. ०९/०९/२०२२, (अनंत चर्तुदशी) रोजी सकाळी १०:०० पासून गणेश मुर्ती विसर्जन कार्यक्रम संपेपर्यत अंमलात राहील.

सदरची वाहतूक अधिसुचना ही पोलीस वाहने, फायरब्रिगेड, रुग्णवाहिका,गणेश मुर्ती विसर्जनातील वाहने व इतर अत्यावश्यक सेवेतील वाहनांना लागु राहणार नाही.

( दत्तात्रय कांबळे )
पोलीस उप आयुक्त, मुख्यालय ०१, ठाणे शहर
अतिरिक्त कार्यभार
वाहतूक विभाग, ठाणे शहर.

प्रति,

जिल्हा माहिती अधिकारी, जिल्हा माहिती अधिकारी कार्यालय, ठाणे.
२/— सदरची अधिसुचना प्रसिध्द करण्यास विनंती आहे.

प्रत माहितीसाठी सादर

मा. पोलीस आयुक्त, ठाणे शहर
मा. पोलीस सह आयुक्त, ठाणे शहर
मा. अपर पोलीस आयुक्त, पश्चिम प्रादेशिक विभाग, ठाणे शहर
मा. जिल्हाधिकारी,ठाणे.
मा. आयुक्त, ठाणे महानगरपालिका,ठाणे.
मा. पोलीस उप आयुक्त, परिमंडळ—१,ठाणे, परिमंडळ—५ वागळे इस्टेट व विशेष शाखा,ठाणे

प्रत कार्यवाहीसाठी :—
प्रादेशिक परिवहन अधिकारी ठाणे.
परिवहन व्यवस्थापक,ठाणे महानगरपालिका,ठाणे, बृहन्मंबई व वसई—विरार महानगरपालिका.
नियंत्रण कक्ष अधिकारी, ठाणे
विभाग नियंत्रक,महाराष्ट्र राज्य परिवहन, ठाणे

प्रत:— पोलीस उप आयुक्त, आर्थिक गुन्हे,ठाणे शहर
२/— सदरची अधिसुचना नागरीकांच्या माहितीसाठी ठाणे शहर पोलीस वेबसाईटवर प्रसिध्दी होणेस विनंती आहे.

प्रत :— समन्वय अधिकारी, ९ ए.एस.कक्ष,ठाणे
२/— सदरची अधिसुचना पोलीस नोटीसमध्ये प्रसिध्दीसाठी.

प्रत :— सपोआ वाहतूक विभाग, ठाणे/वागळे व सर्व संबंधीत प्रभारी अधिकारी, वाहतूक उपविभाग.
२/— म.न.पा.ठाणे च्या संबंधीत अधिकाऱ्यांकडून आवश्यक सुचना फलक लावून घ्यावीत.

CS CamScanner